govt1


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३९१६/ १२०१ दि. १७ जून ,२०१९

**जाहीर सूचना**

**राज्यातील चार कृषी विद्यापीठे / कृषी परिषद / राज्य शासनाची मान्यता नसलेल्या विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / अनधिकृत महाविद्यालये / विद्यालयांबाबत**

## मान्यता नसलेल्या विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / अनधिकृत महाविद्यालये / अशासकीय संस्था / विद्यालयांमधील कृषी पदविका, कृषी व कृषी संलग्न पदवी, पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमांना प्रवेश न घेण्याबाबत

प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्यअंतर्गत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत महाराष्ट्र राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी.एससी. (ऑनर्स) कृषी पदवी, बी.एससी. (ऑनर्स) उद्यानविद्या पदवी, बी.एफ्.एस्सी. (मत्स्यविज्ञान), बी.एससी. (ऑनर्स) वनविद्या पदवी, बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) पदवी, बी. टेक्. (कृषी अन्नतंत्रज्ञान), बी.एससी. (ऑनर्स) सामाजिक विज्ञान पदवी आणि बी.टेक्. (जैवतंत्रज्ञान) पदवी हया व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

तसेच कृषी विद्यापीठांतर्गत बी. एस्सी. (ऑनर्स) (पशुसंवर्धन) आणि बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) या पदवी अभ्यासक्रमांची आणि कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्र पदविका (मराठी माध्यम- २ वर्षे कालावधी), कृषी तंत्रनिकेतन (अर्धइंग्रजी माध्यम- ३ वर्षे कालावधी) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया कृषी विद्यापीठामार्फत राबविण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे / महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांची मान्यता असणे आवश्यक आहे. कृषी परिषदेच्या **www.mcaer.org** या संकेतस्थळावर वरील सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या कृषी पदविका व कृषी, कृषी संलग्न महाविद्यालयांची यादी उपलब्ध आहे.

govt1

येथे असे नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्याकरिता व तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य, उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ (सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०) करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात कृषी शिक्षण मधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यास मनाई करण्यात आली आहे. उक्त अभ्यासक्रमांसाठी प्रवेशोच्छुक विद्यार्थीवर्ग व पालक यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे / महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली हया सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसल्यास अशा विद्यापीठ / शैक्षणिक संस्था / महाविद्यालये / विद्यालयांमध्ये प्रवेश घेऊ नये.

सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेली विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना खोटी अमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे, असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना त्यांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. अशाप्रकारच्या तक्रारी कृषी परिषदेकडेही येत असतात. या पार्श्वभूमीवर सर्व प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना सतर्क करण्यात येते की, कोणत्याही अनधिकृत संस्थेच्या अथवा विद्यापीठाच्या भूलथापांना बळी न पडता अभ्यासक्रमाची संलग्नता तपासून घ्यावी. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अथवा सक्षम प्राधिकरणांच्या संकेतस्थळावर संबंधित महाविद्यालयाचे नाव व अभ्यासक्रम असल्याची खात्री करावी व नंतरच प्रवेश घ्यावा. उपरोक्त अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातील महाविद्यालये / विद्यापीठाच्या मान्यतेबाबत कृषी परिषदेशी किंवा चार कृषी विद्यापीठांशी संपर्क साधल्यास त्याबाबतची अधिक माहिती देण्यात येईल.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५१८/९७०९
दिनांक- १८ जून ,२०१९

(डॉ. हरिहर कौसडीकर)
**सक्षम प्राधिकारी तथा संचालक (शिक्षण),**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद**

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५१८/३०० दि. ५ फेब्रुवारी,२०१८

**मान्यता नसलेल्या विद्यापीठ / अनधिकृत महाविद्यालये / शैक्षणिक संस्था / विद्यालयांमधील कृषी पदविका, कृषी व कृषी संलग्न पदवी, पदव्युत्तर पदवी या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश न घेण्याबाबत जाहीर सूचना प्रसिध्द करणे**

## विशेष जाहीर सूचना

'राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठ, सोलापूर तडवल रोड, ता. अक्कलकोट जि.सोलापूर' नामक विद्यापीठाचे 'राष्ट्रीय मागासवर्ग कृषी विद्यालय माहिती व तंत्रज्ञान' या नावाने विद्यालये आहेत. यामध्ये कृषी पदविका [Agri. Diploma] व कृषी पदवी अभ्यासक्रम [B.Sc. (Agri.)] असल्याचे निदर्शनास आले आहे. या अभ्यासक्रमांना कृषी परिषद किंवा राज्यातील कोणत्याही कृषी विद्यापीठांची मान्यता नाही. अशाप्रकारे खालील विद्यालये / महाविद्यालये / विद्यापीठ / संस्था कार्यरत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. जिल्हानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

**कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र :-** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

| जिल्हा | विद्यालये / महाविद्यालये / संस्थेचे ठीकाण | मु. पो |
|---|---|---|
| सोलापूर | मागासवर्गीय खुले कृषी विद्यालय | १. सांगोला |
| | | २. पंढरपूर |
| | | ३. माढा |
| | | ४. बार्शी |
| | | ५. करमाळा |
| | | ६. मंगळवेढा |
| | | ७. दक्षिण सोलापूर |
| | | ८. मोहोळ |
| | सिध्देवर प्रसाद बहुउद्देशीय सेवा संस्था | ९. सोलापूर |
| | राष्ट्रीय मागासवर्गीय खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान | १०. सोलापूर |
| | | ११. अक्कलकोट |
| | डॉ. बाबासाहेब आंबेडकर रयत वतन रेजिमेंट | १२. सोलापूर |

| जिल्हा | विद्यालये / महाविद्यालये / संस्थेचे ठीकाण | मु. पो |
|---|---|---|
| | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | १३.कोन्हाळी, तडवळ- रेल्वे स्टेशन ता.अक्कलकोट |
| | | १४.तेरामैल, ता.दक्षिण सोलापूर |
| | | १५.बरूर, ता.दक्षिण सोलापूर |
| | | १६.करकंब, भाळवणी ता.पंढरपूर |
| | | १७.महूद ता. सांगाला |
| | | १८.सासुर्डे ता.बार्शी |
| | | १९.कोन्हाळी, ता.करमाळा |
| | | २०.करकंब ता. पंढरपूर |
| | | २१.माळशिरस |
| | ‘राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठ, सोलापूर | २२.तडवल रोड, ता. अक्कलकोट |
| | राष्ट्रीय कृषी शिक्षण संस्थान शोध आणि संशोधन | २३.विजापूर रोड, ता.सोलापूर |
| अहमदनगर | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | २४.जामखेड |
| | | २५.वाघोली |
| | | २६.वाळुंद |
| | | २७.पाथर्डी |
| पुणे | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | २८.आंबेगाव |
| | | २९.आर्वी ता.जुन्नर |
| जळगाव | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | ३०.नेरीवडगाव |
| धुळे | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | ३१.धुळे |
| कोल्हापूर | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | ३२.अडकूर- चांदगड |
| | | ३३.कोडोली ता.पन्हाळा |
| सांगली | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | ३४.शिरसगाव ता.वाळवा |
| | | ३५.दिघंची ता. आटपाडी |
| नाशिक | राष्ट्रीय मागासवर्गीय खुले कृषी महाविद्यालय | ३६.हिरापूर (दरसवाडी) ता.चांदवड |

**कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

| जिल्हा | विद्यालये / महाविद्यालये / संस्थेचे ठीकाण | मु. पो |
|---|---|---|
| बुलडाणा | राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यालय माहिती व तंत्रज्ञान | ३७.येळगाव |
| | | ३८.बुलडाणा |
| | मुक्ताई बहुउद्देशीय संस्था | ३९.बुलडाणा |

**कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र**: वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी (वनामकृवि)

| जिल्हा | विद्यालये / महाविद्यालये / संस्थेचे ठीकाण | मु. पो |
|---|---|---|
| उस्मानाबाद | मागासवर्गीय व खुले कृषी महाविद्यालय | ४०.उस्मानाबाद |
| | छत्रपती शाहु महाराज बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ | ४१.उस्मानाबाद |
| | राष्ट्रीय कृषी विद्यालय माहिती व तंत्रज्ञान | ४२.शिंगोली, ता.उस्मानाबाद |
| | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | ४३.खेड- लोहारा |
| | | ४४.उमरगा |
| | | ४५.रुई- ढोकी |
| | | ४६.नळदुर्ग |
| | | ४७.तुळजापूर |
| बीड | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | ४८.धारूर |
| | | ४९.कासार मुर्शदपूर ता.आष्टी |
| | | ५०.चिखली बीड ता.वडवणी |
| | | ५१.शिरूर ता. बीड |
| | | ५२.मोरगाव ता.बीड |
| | | ५३.पेठसांगवी ता. केज |
| | | ५४.युसुफवडगाव ता.केज |
| लातूर | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | ५५.तपसे चिंचाली |
| | | ५६.शिरुर अनंतपाळ |
| | | ५७.पेठ |
| | | ५८.करडखेल |
| | | ५९.चाकूर |
| | | ६०.किनगाव |
| | | ६१.निवाडा ता.रेणापूर |
| औरंगाबाद | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | ६२.हत्तनूर ता.कन्नड |

**कृषी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र :** डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली

| जिल्हा | विद्यालये / महाविद्यालये / संस्थेचे ठीकाण | मु. पो |
|---|---|---|
| ठाणे | राष्ट्रीय मागासवर्ग खुले कृषी महाविद्यालय माहिती व तंत्रज्ञान विद्यालय | ६३.किनवली ता.शहापूर |